दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

प्रतिनिधी नेमणे आहे

लोकप्रिय विभागीय दैनिक
वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात
सर्वत्र जिल्हा , तालुका , सर्कल व
गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे.
तरी इच्छुकानी मो.न.9422660077,
9766440025 संपर्क साधावा .

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● सोमवार दि.२८ जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २४२ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Monday 28 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 242 ● Pages 4 ● Rate 4 Rs

# त्या दोनशे दिवसात दोन वेळा मरता-मरता राहिलो:सत्य परेशान हो सकता है, पराजित नही

## वंजारी समाजाच्या अधिवेशनात धनंजय मुंडे भावुक

### सत्य परेशान हो सकता है, पराजित नही

माझ्यावर कृषिमंत्री असताना आरोप केले. नियतीने, न्यायव्यवस्थेने न्याय दिला. ज्यांनी कटकारस्थान केले, त्याच्या विरोधातच लाख रुपयाचा दंड झाला. सत्य परेशान हो सकता है, पराजित नही, असे धनंजय मुंडे म्हणाले. संघर्षात काय करायचे तर संयम ठेवायचा. गप्प राहिलो नसतो तर मला जो आजार आला, तो आला नसता. कारण माझा स्वभाव व्यक्त होण्याचा आहे. माझ्या वाणीवर सरस्वती मातेची कृपा आहे. जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष होईपर्यंत कधीच साहेबांच्या स्टेजवर मी नसायचो. संघर्षाच्या काळात आपण माझ्या डोक्यावर हात ठेऊन आशीर्वाद दिले. माझ्या स्वतःच्या अंगाची, माझ्या कातड्याची जोडी जरी आपल्या पायात घातली तरी ते फेटू शकत नाही, असेही मुंडे यावेळी म्हणाले.



**ठाणे (वृत्तसंस्था)**-सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मीक कराड हा धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय असल्यामुळे विरोधकांनी धनंजय मुंडे यांच्या मंत्रिपदाचा राजीनामा मागितला व तो त्यांना द्यावा देखील लागला. त्यानंतर पासून धनंजय मुंडे हे फारसे कुठल्या सामाजिक कार्यक्रमात फारसे आले नव्हते. आज त्यांना वंजारी समाजाच्या राज्यस्तरीय अधिवेशनात बोलावण्यात आले असता, भाषण करताना त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

धनंजय मुंडे म्हणाले, आजच्या कार्यक्रमाला पंकजा ताई येणार होत्या. पण त्या म्हणाल्या मी मागे राहते, भाऊ चालला आहे, माझे वतीने शुभेच्छा दे. त्यांच्या वतीने देखील मी तुम्हाला शुभेच्छा देतो. माझ्या जीवनातला पहिला संघर्ष मी मुंडे साहेबांचा पाहिला. त्यांच्या जीवनातील प्रवास आठवला तरी अंगावर काटा येतो. आज जे काही माझ्यासोबत झाले आहे ते मी सर्व स्वीकारीन. टीका स्वीकारीन, व्यक्ती म्हणून धनंजय मुंडेवर टीका करा. धनंजय मुंडे जर चुकला असेल तर त्याला माफ करू नका, जे काही असेल ते माझ्यापर्यंत राहावे, माझ्या जातीपर्यंत नसावे.

### दोनशे दिवसात मी दोन वेळा मरता-मरता राहिलो

पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले, दोष एका व्यक्तीचा असेल तर त्याला फाशी द्या. पण त्या आधारावर सगळ्या समाजाला दोषी ठरवू नका. धनंजय मुंडेच्या जिल्ह्यापर्यंत आई, बाप, मुलाबाळापर्यंत हे कधीच आले नव्हते. माझ्यासह माझी जात व माझा जिल्हा एवढा बदनाम करावा? एक-दोन दिवस नाही, दोनशे दिवस एखाद्या जिल्ह्याची, एखाद्या व्यक्तीची, एखाद्या व्यक्तीच्या जातीची मीडिया ट्रायल कधीच कोणी केली नसेल, ते मी सहन केले. त्या दोनशे दिवसात मी दोनवेळा मरता-मरता राहिलो. ज्या समाजात जन्माला आलो, त्याचा अभिमान निश्चित आहे. अडचणीच्या काळात ज्याला धनंजय मुंडेंचा नंबर आठवतो, यापेक्षा दुसरे काय हवे? मंत्रिपदाला काय चाटायचे आहे का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

## अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या उपविभागीय कार्यालयाचे उद्घाटन



**बीड । प्रतिनिधी**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचा अधिकाधिक लाभ, पात्र लाभार्थ्यांना व्हावा या उद्देशाने बीड शहरामध्ये महामंडळाच्या मराठवाड्यातील उपविभागीय कार्यालयाचे आज मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले. याप्रसंगी महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, श्रीक्षेत्र नारायणगडचे महंत शिवाजी महाराज, धनंजय देशमुख आदी उपस्थित होते. उद्घाटन कार्यक्रम जालना रोडवरील राजू कॉम्प्लेक्स येथे पार पडला. मराठा समाजाला आर्थिक सक्षम करायचे ध्येय असून त्यासाठी महामंडळाकडून अधिक मेहनत, परिश्रम घेण्यात येईल, असे पाटील यावेळी म्हणाले.

या कार्यालयाच्या उद्घाटनानंतर यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात मेळावाही पार पडला. मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमातही पाटील यांनी मार्गदर्शन केले.

## विजय सोनवणेच्या ॲट्रॉसिटी व अपहरण प्रकरणातील आरोपी नेकनूर पोलिसांच्या आशीर्वादाने मोकाट

**बीड । प्रतिनिधी**

नेकनूर पोलीस स्टेशन अंतर्गत विजय सोनवणे यांच्यावर बारा दिवसापूर्वी पाठीमागून येऊन साखळी त्याचा वापर करत गंभीर जखमी केले होते. व जाती वाचक शिवागाव अपर्णाची धमकी देण्यात आली होती. ट्रॉसिटी व अपहरण अंतर्गत गुन्हा दाखल झाला व अमाणूस पणे मारहाण करणा-या आरोपी तेजस अशोक मांडवे,आदित्य अशोक मांडवे यांना तात्काळ अटक अटक करून कायद्याचा वचक बसवावा.

आरोपी हे राहणार मसेवाडी ता. जि. बीड याठिकाणी स्वतःचे ट्रॅक्टर घेऊन गावात गुंडपणा करतात राजकीय दबाव टाकतात तसेच जेष्ठ व्यक्ती तसेच अन्य लोकांना अरेरावीची भाषा वापरतात. मागील दि. १६/०७/२०२५ रोजी त्यांनी गावातीलच विजय सोनवणे या रिक्षाचालक युवकाण बेसावध असताना लोखंडी चैनने डोक्यात मारुन टाकण्याच्या विचाराने मारहान केली तसेच त्यास जातीवाचक शिवीगाळ केली त्याच्या आईस व पत्नीस धमकी दिली आणि हे सर्व करुनही नेकनूर पोलिसांनी त्यांना अटक केली नाही. आणि ते आरोपी गावात मोकाट फिरत आहेत, काही आरोपी सोनवणे जीवे मारण्याचा धमक्या




देत आहेत.घटनेची सत्यता तपासुन तसेच गांभीर्य लक्षात घेऊन यावर लक्ष द्यावे. अशी मागणी पोलीस अधीक्षक नवनीत त्यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली आहे.

**नेकनूर पोलीस योग्य तपास करत नसल्याने समाजसेविका आम्रपाली साबळे व सोनवणे यांच्या कुटुंबीयांनी बीड येथील पोलीस अधीक्षक कार्यालयात भेट घेण्याचा प्रयत्न केला. परंतु भेट झाली नाही लवकरच भेट घेणार असले चे सांगितले आहे. सोनवणे कुटुंबात झालेल्या अन्याय अत्याचार मानवतेला काळीमा फासणार आहे. त्यांना न्याय मिळत नाही तोपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाहीत असे आम्रपाली साबळे यांनी सांगितले आहे.**

## पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त कोल्हेवाडी येथे वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न

**केज । प्रतिनिधी**

ग्रामपंचायत कोल्हेवाडी येथे दि.२६ जुलै २०२५ रोजी महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री मा.ना.पंकजाताई गोपीनाथरावजी मुंडे यांचा वाढदिवस एक सामाजिक उपक्रमा अंतर्गत वृक्ष लागवड करून साजरा केला.

वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या प्रमाणे सजीवांचे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी वृक्षारोपण करणे काळाची गरज आहे.

वृक्ष (झाडे) आपणास ऑक्सिजन देतात, ऑक्सीजन ज्याच्या शिवाय आपण काही मिनिटांपेक्षा जास्त जगू शकत नाही.वृक्ष आपल्याला सावली देतात.पशू,पक्षी या सावलीत रखरखत्या सूर्यापासून आसरा घेतात.वृक्षांची मुळे जमिनीची धूप थांबवतात.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून असा हा सामाजिक उपक्रम कोल्हेवाडीच्या ग्रामस्थांनी हाती घेतला व कोल्हेवाडी येथील मुख्य रस्त्याच्या लगत, जिल्हा परिषद शाळा मिसाळ वस्ती,जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोल्हेवाडी या ठिकाणी वृक्ष लागवड केली. याप्रसंगी कोल्हेवाडी पंचक्रोशीतील ग्रामस्थ सरपंच-उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारीआदी उपस्थित होते.



## हिंगोली जिल्ह्यात काँग्रेसला धक्का: अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष सुमेध मुळे शिंदे सेनेत दाखल

**हिंगोली । प्रतिनिधी**

सविस्तर वृत्त हिंगोली जिल्हा काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या गळतीला आज आणखी एक मोठा धक्का बसला असून, काँग्रेसच्या अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष सुमेध मुळे यांनी पक्षाला रामराम ठोकत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (शिंदे गट) मध्ये जाहीर प्रवेश केला. हिंगोली येथे आयोजित कार्यक्रमात आमदार संतोष बांगर यांच्या उपस्थितीत त्यांचा पक्षप्रवेश करून सत्कार करण्यात आला.विशेष म्हणजे, पक्षप्रवेशासोबतच सुमेध मुळे यांची शिंदे सेनेच्या दलित आघाडीच्या जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली असून, त्याचा अधिकृत घोषणाही याच कार्यक्रमात करण्यात आली. या प्रसंगी माजी सभापती श्रीराम बांगर, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख राम कदम, वसमत तालुकाध्यक्ष राजेंद्र शिखरे, राजू चापके, संजय पाटील बोंढारे यांची विशेष उपस्थिती होती.हिंगोलीतील काँग्रेसमध्ये गेल्या काही दिवसांपासून नेतृत्व स्तरावर मोठी पडझड सुरु असून, स्थानिक नेतृत्व पूर्णतः हतबल झाल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. अलिकडेच काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष दिलीप देसाई यांनी राजीनामा देऊन भाजप मध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बालाजी कर्डीले यांनीही काँग्रेसला सोडचिठ्ठी देत ठाकरे गटात प्रवेश केला. मुंबई येथे माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला होता.याचप्रमाणे, वसमत येथील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ. एम.आर. क्यातमवार यांनी देखील काँग्रेसला सोडचिठ्ठी देत शिंदे सेनेत प्रवेश केला आहे.

## परळीसाठी 'ऑक्सिजन बँक' १५,००० झाडांची घनदाट लागवडीचे ऐतिहासिक पाऊल

### दीपकराव (नाना) देशमुख यांचा स्तुत्य उपक्रम




**परळी । प्रतिनिधी**

प्रदूषणाच्या वाढत्या झळा सहन करणाऱ्या परळी शहरासाठी एक सकारात्मक आणि हरित आशेचा श्वास निर्माण करत, 'ऑक्सिजन बँक' स्थापन करण्याच्या दिशेने ऐतिहासिक पाऊल उचलण्यात आलं आहे.

श्री सप्तश्रृंगी दुर्गा सेवाभावी संस्था संचलित वैजनाथराव मुकुंदराव देशमुख (व्ही.एम.डी.) नर्सिंग कॉलेजच्या परिसरात १५,००० झाडांची घनदाट लागवड (Dense Forest Plantation) करण्याचा स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला असून, या योजनेचा शुभारंभ संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व माजी नगराध्यक्ष मा. दीपकराव (नाना) देशमुख यांच्या हस्ते झाला.वृक्षलागवड ही काळाची गरज नसून भावी पिढ्यांसाठी श्वास घेण्याची हमी आहे, असे यावेळी बोलताना दीपकराव देशमुख म्हणाले.उपस्थितीत सामाजिक वनीकरण विभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी श्री भैरवाल आणि वनरक्षक वैजनाथ दौंड यांच्यासह अनेक पर्यावरणप्रेमींचा सहभाग होता.परळी प्रदूषणमुक्त करण्यासाठी सुरू झालेला हा उपक्रम भविष्यात शहराच्या आरोग्यासाठी संजीवनी ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

संपादकीय

# सरी, सरगम अन् साधना...

सृष्टीतील प्रत्येक बदलणाऱ्या ऋतूला स्वतःची अशी एक सरगम असते. उत्स्फूर्त पण तरीही नेटकेपणाने बांधलेली. ऋतूंची पावले दिशा बदलू लागताच वातावरणातील ती सरगम हलके हलके आपले स्वर बदलू लागते. ही बदलाची लय एवढी संथ असते, की प्रारंभी घुंगरांची फक्त हलकी किणकिण कानावर पडायला लागते. भोवतालची सरगम बदलत असल्याची खोलवर जाणीव तेव्हा कुठेतरी होऊ लागते. मग सुरू होते प्रतीक्षा नव्या ऋतूच्या नव्या सरगम स्वरांची. निसर्गाचे बदलते रूप अंगभर दिमाखाने मिरवणारी आणि आपल्या नकळत सर्वांना त्या रूप-गुणात भिजवून टाकणारी...

ग्रीष्माची तडतडणारी लाही फुटते, तेव्हा त्या उष्ण-कढत वाफांमध्ये असते मेघ-मल्हाराची ओलसर दमट बीज. काळ्या मातीशी लगटून राहिलेली. पावसाची पहिली सर येते आणि या मल्हाराच्या बीजांना पोपटी अंकुर फुटू लागतात. कोमल-तीव्र स्वरांचे अंकुर. त्यासाठी नेमके कोणी कोणाला आमंत्रण दिलेले असते? ग्रीष्माच्या पोटातील मल्हाराची ओली बीजे पावसाला आमंत्रण देतात की, पावसाच्या भाराने जड झालेला मेघ मल्हाराच्या या स्वरांना व्याकूळ होऊन हाका घालतो? या कोड्याचे उत्तर तानसेन नावाच्या माणसाला विचारले पाहिजे. त्याच्याच तर मल्हारामुळे म्हणे मेघ दाटून आले. आणि मग तानसेनांच्या ताना सुरू झाल्यावर तर अनिवारपणे फुटलेल्या मेघातून पावसाच्या सरी बरसू लागल्या. काळ्या मातीत बसून आकाशाकडे बघत असलेल्या माणसाला त्या भिजवून टाकतातच, पण त्याच्या डोळ्यांच्या डोहातही पाणी जमा करतात या सरी...

हा मल्हार मग हळूहळू आपले बस्तान मांडू लागतो. एव्हाना निसर्गातील घुंगरांनी लय पकडलेली असते आणि बोट पकडून बरसण्यासाठी तेवढा नाद पाऊससरींना पुरेसा असतो. या बरसण्याच्या पण किती तऱ्हा! एखाद्या दिवशी दिसभर संथ लयीत पावसाची बंदिश सुरू राहते, तर कधी एखाद्या तराण्यासारखी झडझडून कोसळून जाते. या तराण्याचे बोल आपल्या मुठीत पकडेपर्यंत ती आपल्याला चुटपूट लावत निघूनही गेलेली असते..!पाऊस आणि संगीत, पाऊस आणि नृत्य, पाऊस आणि कविता असे जीवनाच्या प्रत्येक अनुभवाशी पावसाचे एक स्वतंत्र नाते आहे. वेगळे आणि खास. कृष्णाचे आणि मीरेचे, कृष्णाचे आणि राधेचे कसे वेगळे, खास नाते होते तसे! पावसाच्या सरी येऊ लागताच मला नेहमी आठवण येते ती अनेक वर्षांपूर्वीच्या एका मैफलीची. पंडित बिरजू महाराज रंगमंचावर आले तेव्हा रात्रीचे दोन वाजले होते. ऐन डिसेंबरमधील थंडीचा कडाका एखाद्या दाट दुलईसारखा त्या खुल्या मैदानावर पसरला होता. महाराजजी रंगमंचावर अगदी समोर लावलेल्या फूट माइकजवळ उभे राहिले... स्तब्ध... वातावरणात आता फक्त श्वासांचे आवाज होते. एखादा क्षण तसाच गेला आणि दूरवर कुठेतरी मातीत पावसाचा एक थेंब पडल्याचा आवाज आला. मग दुसरा.. तिसरा.. टपटप.. टपटप.. त्या थेंबांमध्ये लय होती. हळूहळू थेंबांचे रूपांतर हलक्या सरींमध्ये होऊ लागले. आणि मग 'पावसा'चा मारा असा वाढत गेला, की पळत छत्री शोधायला किवा आडोशाला जाऊन उभे राहावे, असे ते ऐकता ऐकता वाटायला लागले. ही होती महाराजजींच्या पायांतील घुंगरांची किमया! रंगमंचावर उभ्या महाराजजींची फक्त पावले आणि त्यात बांधलेली घुंगरे हलत होती आणि त्यांच्या परवानगीशिवाय एकही घुंगरू विनाकारण वाजत नव्हते! आता जेव्हा जेव्हा पावसाची अशी टपटप सुरू होते, तेव्हा मला आठवते ती थंडीने गोठलेली रात्र आणि अनुभवलेला पाऊस, जो प्रत्यक्षात पडलाच नाही पण सर्वांना गच्च भिजवून गेला. पावसाची ती पाऊलखूण मनात तशीच ओली आहे.पाऊस म्हणजे नेमके काय? माथ्यावर फिरणाऱ्या गच्च भरलेल्या ढगातील पाणी खाली कोसळणे एवढीच काय ती पर्यावरणीय घटना? नद्यांच्या ओटीत खळाळत्या पाण्याचे भरभरून दान टाकणाऱ्या, शेताच्या मुठीत हिरव्या अंकुराची श्रीमंती पेरणारा हा पाऊस फक्त असा काही पर्यावरणीय क्रिया-प्रतिक्रियांमुळे येतो? कोणीही आमंत्रण न देताच? तुम्हीच विचार करा, शेजारी राहणाऱ्या फलाण्या कोणाला आपल्या घरी चहाला येण्यासाठीसुद्धा आमंत्रण द्यावे लागते; मग सर्व सृष्टी समृद्ध, सृजनक्षम करणारा तो पर्जन्यराजा असा कोणाच्याही निमंत्रणाविना येत असेल? त्यालाही यथासांग निमंत्रण लागत असणारच. आपल्या स्वरांमधून त्याला परोपरीने आळवणाऱ्या तानसेनाचे आमंत्रण त्याला हवे असते. घुंगरांची किणकिण करीत वातावरणात नाद भरून टाकणाऱ्या महाराजजींसारख्या एखाद्या साधकाच्या बोलावण्याची तो वाट बघत असतो. खरे म्हणजे, पावसाला आमंत्रण देणे हीसुद्धा एक उग्र-कठोर साधना असते. उन्हाळ्याची जीवघेणी तलखी चार महिने सृष्टी सोसत असते ती या साधनेच्या भावाने. आणि एखादा कलाकार रात्र-रात्र मल्हाराच्या स्वरांना जागवत राहतो तीही त्या पावसाची मनोभावे केलेली उपासनाच असते. त्याने यावे आणि सुकलेल्या, शुष्क झालेल्या सगळ्या जिवांना संजीवनी द्यावी यासाठी केलेली निरपेक्ष उपासना!पण पर्जन्याचा प्रत्येक थेंब मोती धरावा तसे आपल्या ओंजळीत धरणारे कलाकार, संवेदनशील माणसे हळूहळू अदृश्य झाली. मग झाडे, फुले, पक्षी, निळे आकाश, मऊ माती या गोष्टी अधूनमधून बघण्यासाठी शहरातील माणसांना दूरवर जाण्याची वेळ आली. ऋतूनुसार निसर्गसौंदर्य दाखवणारी पॅकेज विकणारी जमात फोफावली. कोणीतरी आखलेल्या सहली पार करून आलेली आणि एरवी तापणारे ऊन, कोसळत राहणारा पाऊस याबद्दल सतत फक्त तक्रार करणारी माणसे जेव्हा अवतीभोवती दिसू लागतात, तेव्हा ऋतूंनासुद्धा कंटाळा येऊ शकतो त्यांचा. आपण ज्याची वाट डोळ्यांत प्राण आणून वाट बघतोय तोही असाच कंटाळून पाठ फिरवून निघून गेला तर? डोळे वटारून उग्र रूपात उभ्या निसर्गाचा हा अबोल राग आजच्या माणसाला समजतोय की नाही? समजणार की नाही?

# पार्किंग शुल्काचे कडू औषध गरजेचे योजना चांगली,पण नियोजन चुकीचे

शहरातील वाहनांची संख्या बेसुमार वाढत असताना, सर्वाधिक वर्दळीच्या ठिकाणी पार्किंग शुल्क आकारून वाहनांची संख्या नियंत्रित करता येऊ शकते. पुणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने निश्चित केलेल्या धोरणानुसार शहरातील किमान पाच रस्त्यांवर 'प्रायोगिक' स्वरूपात 'पे अँड पार्क'ची योजना राबविणे शक्य आहे. परंतु, केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून प्रत्येक राजकीय पक्ष हा निर्णय पुढे ढकलण्यासाठी आग्रह धरत असेल, तर त्यातून शहराचे नुकसान होणार आहे.देशातील सर्वच मोठ्या शहरांमध्ये सध्या वाढणारी वाहनसंख्या नियंत्रित कशी करायची, हा सध्या सर्वाधिक चर्चेचा विषय आहे. पुण्यात तर २१वे शतक सुरू झाल्यापासून हाच मुद्दा चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. त्यासाठी आत्तापर्यंत अनेक उपाययोजना सुचवून झाल्या. त्यापैकी काहींची अंमलबजावणी झाली, तर काही कागदावरच राहिल्या. गेल्या सहा वर्षांपासून कागदावर राहिलेला असाच एक उपाय म्हणजे 'पे अँड पार्क' योजना. पुणे महानगरपालिकेच्या मालकीच्या सार्वजनिक रस्त्यांचा वापर वाहनांच्या पार्किंगसाठी करायचा असेल, तर त्यासाठी ठरावीक शुल्क वापरकर्त्याने दिले पाहिजे, अशी ही योजना. ही व्यवस्था पुण्यात नव्याने लागू होणार होती, असे अजिबात नाही. यापूर्वी शहरातील अनेक रस्त्यांवर 'पे अँड पार्क' योजना अस्तित्वात होती. अगदी जंगली महाराज रस्ता आणि गोपळ कृष्ण गोखले (एफसी रोड) या महत्त्वाच्या रस्त्यांवर नागरिकांना शुल्क भरावे लागत होते. मध्यंतरीच्या काळात ही योजना गुंडाळली गेली. त्यानंतर, महापालिकेने २०१८मध्ये नव्याने 'पार्किंग धोरण' राबविण्याचा निर्णय घेतला. त्या वेळी संपूर्ण शहरात एकाचवेळी ही योजना राबविण्याऐवजी ठरावीक पाच रस्त्यांवर 'प्रायोगिक' स्वरूपात योजना राबवून मग ती शहरभर लागू करावी, असा निर्णय सर्वसाधारण सभेने घेतला. या निर्णयाला सहा वर्षे पूर्ण झाली; पण अजूनही कोणत्या पाच रस्त्यांवर ही योजना राबवायची, याचा निर्णय महापालिकेला घेता आलेला नाही. मार्च २०२२नंतर तर महापालिकेत लोकप्रतिनिधींची सत्ता नाही, तरीही केवळ राजकीय पक्षांचा विरोध होईल म्हणून सर्व अधिकार असतानाही आयुक्त तथा प्रशासक ही योजना पुढे नेऊ शकलेले नाहीत.या पाच वर्षांमध्ये पुण्यातील किमान २० किमी मार्गावर मेट्रोची सेवा सुरू झाली आहे. पुढील दोन-तीन महिन्यांत त्यात आणखी वाढ होऊन शहरातील मंडई-तुळशीबागसारखा मध्यवर्ती भाग आणि स्वारगेटसारखा अत्यंत वर्दळीचा भाग जोडला जाणार आहे. खासगी वाहनांऐवजी मेट्रोसारख्या सार्वजनिक वाहतुकीला प्रोत्साहन देण्याचे धोरण असेल, तर शहरात मेट्रो सुरू झालेल्या मार्गांवर तरी सुरुवातीच्या टप्प्यात किमान चारचाकी वाहनांसाठी 'पे अँड पार्क' सुरू करण्याचा निर्णय कधीतरी घ्यावा लागणार आहे. वनाझजवळून डेक्कन किंवा पुणे महापालिकेजवळच्या भागात येणाऱ्यांना मोफत पार्किंगमुळे दर वेळी 'चारचाकी' घेऊन जाणे सोयीचे वाटते. मेट्रो असतानाही चारचाकी आणून वाहतूक कोंडीत भर घालण्याचा 'भार' त्यांच्यावर टाकायलाच हवा. हीच चारचाकी एखाद्या मॉल किंवा मल्टिप्लेक्समध्ये नेली, तर पार्किंगसाठी जागेच्या वापराचे शुल्क वाहनचालकाला द्यावेच लागते; तसेच सार्वजनिक रस्त्याचा वापर करण्याचे शुल्क चारचाकीकडून वसूल करण्यासाठी खरेतर सहा-सहा वर्षे विलंब लावण्याची गरज नाही. मात्र, लोकानुनयाची सवय लागलेल्या कोणत्याही राजकीय पक्षाकडून नागरिकांच्या खिशात हात घालण्याचा निर्णय घेतला जाण्याची शक्यता सध्याच्या निवडणुकांच्या राजकारणात एकूणच कमी झाली आहे. वस्तू आणि सेवा कराच्या (जीएसटी) किंवा पेट्रोल-डिझेलवरील विविध अधिभारांच्या माध्यमातून नागरिकांकडून पैसे वसूल करणारे कोणतेही सरकार स्थानिक स्तरावर नागरिकांकडून शुल्क वसूल करण्यासाठी एवढे का कचरते? महापालिकेच्या मालकीच्या नाट्यगृहात अथवा सरकारच्या प्रादेशक परिवहन कार्यालयातही (आरटीओ) पार्किंगसाठी सर्व वाहनांना शुल्क द्यावे लागत असेल, तर सार्वजनिक रस्त्याच्या वापराकरिता शुल्क घेण्यासाठी राजकीय पक्ष, प्रशासन यांना एवढी भीती का वाटावी? महापालिकेच्या सर्वसाधारण सभेच्या निर्णयानुसार पार्किंगमधून जमा होणारे शुल्क हे वाहतुकीशी संबंधित पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठीच वापरले जाणार आहे. तरीही, हे कागदावरील धोरण प्रत्यक्षात यावे, यासाठी निर्णय घेण्याची धमक का दाखवली जात नाही. वाहतुकीसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांनी राजकीय पक्ष, नेते मंडळींकडे त्याचा पाठपुरावा केला, तरीही महापौरांच्या अखत्यारित असलेला निर्णय आम्ही घेऊ शकत नाही, असे एक पठडीतले वाक्य ऐकविले की प्रशासनाचे काम झाले.पुण्यात गेल्या तीन ते चार वर्षांत वाहनांची संख्या बेसुमार वाढली आहे. दुचाकीप्रमाणेच अलीकडच्या काळात तर चारचाकी वाहनांमध्ये प्रचंड वाढ होत आहे. (सोबतच्या चौकटीतून ते लक्षात येईलच) अलीकडच्या काळात मारुती ८००, इंडिका अशा छोट्या (लांबीने कमी) वाहनांऐवजी एसयूव्ही आणि इतर 'टॉप एंड मॉडेल' (लांबीने जास्त) वाहने घेण्याकडे अधिक कल दिसून येतो. रस्त्यावर कोणत्याही वेळेत १०० चारचाकी वाहने मोजली, तर त्यापैकी ६० ते ७० वाहने ही एसयूव्ही किंवा तत्सम प्रकारात दिसतील. अशाने कितीही रस्ते रुंद केले, त्यांची लांबी वाढवली, भले मोठे उड्डाणपूल बांधले, तरी वाहनांनी ते व्यापलेच जाणार आहेत. त्यामुळे सार्वजनिक वाहतुकीला प्रोत्साहन देताना, खासगी वाहने नियंत्रित करायची असतील, तर मेट्रो-बसच्या तिकीटापेक्षा अधिक शुल्क या गाड्यांच्या पार्किंगसाठी असले पाहिजे. हा पुण्याचा नाही, तर जागतिक स्तरावर वापरला जात असलेला नियम आहे. इतर वेळी जगाशी बरोबरी करणारे पुणे याबाबत मागे का?पुण्यात 'कोव्हिड'नंतर चारचाकी नोंदणीची आकडेवारी पाहिली, तर दरवर्षी त्यात किमान ८ ते १० टक्के वाढ होत आहे. २०२१ मध्ये संपूर्ण वर्षभरात पुण्यात नोंदणी झालेल्या चारचाकींची संख्या साधारणतः ५० हजार होती. २०२३ मध्ये पुण्यात ७१ हजार चारचाकींची नव्याने नोंदणी झाली. म्हणजेच, दोन वर्षांत चारचाकी गाडी खरेदीमधील वाढ ४० टक्के आहे. या वर्षी, म्हणजे २०२४चे सहा महिनेही अजून संपले नाहीत, तर ३१ हजार चारचाकींची विक्री झाली आहे. पुण्यात अनेक भागांत चारचाकी पार्किंगसाठी जागा मिळत नाही. विशेषत: बरीच कार्यालये किंवा बाजारपेठांच्या भागांत महापालिकेचे वाहनतळ अपुरे पडतात. अशावेळी सर्वच चारचाकी वाहने रस्त्यावर, प्रमुख रस्त्यालगतच्या लहान-मोठ्या गल्ली-बोळात लावली जातात. त्यातून मुख्य रस्त्यांसह हे गल्ली-बोळ वाहतूक कोंडीत फसतात. या सर्व गोष्टी सर्वांना माहीत असल्या, तरी शुल्क लावण्याचा 'कठोर' आणि 'कटू' निर्णय घेण्याचे धाडस कोणात नाही, हीच वस्तुस्थिती आहे.

**योजना चांगली; पण नियोजन चुकीचे-सुनील लांडगे**

देशातील शहरी लोकसंख्या कमालीच्या वेगाने वाढत आहे. त्याला पिंपरी-चिंचवड अपवाद नाही. या शहराची सध्याची लोकसंख्या ३० लाखांवर पोहचली आहे. त्यामुळे पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करणे क्रमप्राप्त आहे. शहरी वाहतूक ही प्रमुख समस्या बनली आहे. त्यामुळे लोकांच्या गतिशीलतेवर आणि आर्थिक वाढीवर परिणाम होत आहे. त्या अनुषंगाने केंद्र सरकारने २००६मध्ये राष्ट्रीय शहरी वाहतूक धोरण मंजूर केले आहे. त्याअंतर्गत शहर वाहतूक धोरण तयार करण्यात आले आहे. वाहतूक नियोजन आणि वाहनतळ हा त्याचा एक भाग आहे.अस्ताव्यस्त पार्किंग आणि अवैधरित्या रस्त्यावर वाहने पार्क केल्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. त्याचा मानवी जीवनावर विपरित परिणाम होऊन गतिशीलतेला अडथळा येतो. या बाबी लक्षात घेऊन महापालिकेने वाहतूक पोलिसांच्या साह्याने शहरामध्ये 'पे अँड पार्क' योजना तयार केली. त्यासाठीची ठिकाणे निश्चित केली. ही योजना प्रायोगिक तत्त्वावर राबविण्याचा निर्णय घेतला. त्याचे काम खासगी संस्थेला देण्यात आले. मात्र, कराराची मुदत संपुष्टात येण्यापूर्वीच योजनेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले. अखेरीस मुदत संपल्याचे कारण देऊन योजना बासनात गुंडाळण्यात आली.शहराचा विस्तार चारही बाजूंनी होत असताना दिवसेंदिवस वाहनांच्या संख्येत वाढ होत आहे. यामध्ये दुचाकी आणि कारची संख्या लक्षणीय आहे. पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयातील नोंदीनुसार २०१९-२० ते २०२१-२२ या तीन वर्षांच्या कालावधीत शहर आणि परिसरात जवळपास २० लाख नवीन वाहनांची नोंद झाली आहे. यामध्ये दुचाकी, तीनचाकी, ऑटो रिक्षा, कार-जीप, बस, ट्रक आणि इतर वाहनांचा समावेश आहे. यावरून शहरात धावणाऱ्या वाहनांची संख्या लक्षात येते.या सर्व वाहनांना शिस्त हवी, यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही. त्यासाठी 'पे अँड पार्क' योजना गरजेचीच आहे; मात्र त्याचे नियोजनदेखील काटेकोर आणि निष्पक्षपातीपणे व्हायला हवे. तसे होत नसल्यामुळे नागरिक आणि प्रशासन एकमेकांकडे बोट दाखवित आहेत. महापालिकेच्या विकास आराखड्यामध्ये दर्शविलेली वाहनतळाची आरक्षणे किती प्रमाणात विकसित केली आहेत, हा मुद्दा प्राधान्याने विचारात घ्यायला हवा. मुळात आराखड्यानुसार आरक्षणे विकसित करण्याचा वेग ३० टक्क्यांपेक्षा जास्त नाही. त्यामुळे वाहनतळाच्या आरक्षणाविषयी न बोललेच बरे!गरज आणि प्राधान्यक्रम यादीनुसार रस्त्यांचा विकास झाला. शहरभर प्रशस्त रस्त्यांचे जाळे निर्माण झाले. एका ठिकाणाहून दुसरीकडे जाण्याचा वेग वाढला. वेळेत बचत झाली. दुसरीकडे वाहनांच्या पार्किंगची समस्या बिकट झाली आहे. पिंपरी, चिंचवड, निगडी, भोसरी, आकुर्डी, पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, मोशी, चिखली, चऱ्होली येथील बाजारपेठांच्या ठिकाणी वाहने कोठे पार्क करायची, असा प्रश्न निर्माण होतो. अनेक जण रस्त्यांवरच वाहने उभी करतात. त्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होते. तासन् तास वाहने एकाच जागेवर उभी असतात. नागरिक कमालीचे त्रस्त होतात. चिडचिड निर्माण होऊन वादाचे प्रसंग उद्भवतात. उदाहरणच द्यायचे झाले, तर हिंजवडी, पिंपरी कॅम्प आणि भोसरी आळंदी रोड येथील वाहतूक कोंडीचे देता येईल. या ठिकाणी रात्रीच्या वेळी होणारी अभूतपूर्व वाहतूक कोंडी अंगावर काटा आणणारी असते. एक वेळ पायी चालणारी व्यक्ती इच्छित स्थळी लवकर पोहचते. मात्र, वाहन चालविणारी व्यक्ती आहे त्याच ठिकाणी थांबलेली असते. या वेळी हतबल वाहनचालक वाहतूक पोलिस आणि प्रशासनाच्या नावाने शिव्याशाप देऊन मनाला शांत करण्याचा प्रयत्न करतो, तर प्रशासन मूग गिळून गप्प बसलेले असते.शहरातील मॉल, मल्टिप्लेक्स किंवा खासगी व्यावसायिक भव्य इमारती या ठिकाणी वाहने उभी करण्यासाठी नागरिक पैसे देत नाहीत का? तर, नक्कीच देतात. त्यासाठी कधी किरकिर करीत नाहीत किंवा वादही घालत नाहीत. मग, पालिकेच्या 'पे अँड पार्क' योजनेला का विरोध करतात? याचा सखोल विचार व्हायला हवा. सार्वजनिक सुविधा पुरविण्यात प्रशासन कुठेतरी कमी पडते, हीच बाब स्पष्ट होते.शहरात ज्या ठिकाणी 'पे अँड पार्क'ची योजन राबविली. ती बरीचशी उड्डाणपुलाखालील ठिकाणे होती. या उड्डाणपुलाखाली कोणत्याही प्रकारची पक्की किंवा कच्ची बांधकामे असू नयेत, असे न्यायालयाचे आदेश आहेत. ते पायदळी तुडवून अनेक उड्डाणपुलाखाली वाहतूक पोलिसांच्या चौक्या थाटलेल्या आहेत. बसथांबे आणि सार्वजनिक स्वच्छतागृहे उभारली आहेत. इतकेच काय पालिकेने व्यापारी गाळे थाटले आहेत. त्याला अधिकृत म्हणता येणार नाही. मग, वाहनतळ अधिकृत कसे काय होऊ शकते, असा नागरिकांचा प्रश्न आहे.महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये वाहनतळाची पुरेशी सुविधा नाही. त्यामुळे अधिकारी, कर्मचाऱ्यांसह नागरिक त्यांची वाहने रस्त्याच्या कडेला उभी करतात. दुसऱ्या बाजूला वाहनांचे पार्किंग करण्यासाठी नागरिक शुल्क का देतील? वसुली करणाऱ्या संस्थेच्या कर्मचाऱ्यांशी वाद होणारच ना! याशिवाय अनेक ठिकाणी सार्वजनिक जागेवर वाहने उभी करणाऱ्या चालकांना दमदाटी करून स्थानिक गुंड पैशांची वसुली करतात. त्याचे हप्ते वाहतूक पोलिसांना पोहचतात. शिस्तीच्या नावाखाली बेशिस्तपणे वागणाऱ्यांना कोण चाप लावणार? या बाबींचा गांभीर्याने विचार होण्याची गरज आहे.पालिका प्रशासनाने शहरातील वाहनतळाच्या जागा निश्चित करताना कोणते निकष लावले? न्यायालयाच्या आदेशाचा भंग तर झाला नाही ना? नागरिकांसाठी सुयोग्य पर्याय काय आहे? त्यांनी सुरक्षित ठिकाणी वाहने कोठे पार्क करायची? याबाबत साकल्याने विचार होत नाही. केवळ केंद्र किंवा राज्य सरकारने केलेल्या सूचनेनुसार धोरण तयार करायचे. कागदोपत्री अहवाल तयार करायचे आणि सर्व काही अलबेल असल्यासारखे दाखवायचे! अशाप्रकारे सुधारणा होणार तर नाहीच; परंतु दिवसेंदिवस वाहतुकीची समस्या मात्र जटील होत राहणार आहे. त्यावर वेळीच कठोर आणि सुयोग्य पद्धतीने मार्ग काढायला हवा.

# भातावरून शेतीची परीक्षा

लोकसभा निवडणुकीची धामधूम सुरू असताना देशभरात खरिप हंगामाच्या मशागतीची कामे वेगाने सुरू होती. पण, शेतीचा मुद्दा प्रचारात फारसा कुठेही नव्हता. आजही देशातील निम्म्याहून अधिक लोकसंख्येचा उदरनिर्वाह शेतीवर अवलंबून असताना या क्षेत्राबाबत प्रचारातील अनुल्लेख उल्लेखनीय असला तरी आश्चर्यकारक अजिबात नाही. या क्षेत्राबद्दलच्या वर्षानुवर्षांच्या अनास्थेचे ते बोलके उदाहरण आहे. त्यास तेलंगण किंचित अपवाद ठरले. गेल्या आठवड्यात संपूर्ण देशात निवडणूक निकाल चर्चेच्या केंद्रस्थानी असताना तेलंगणमध्ये तांदळावर जागतिक मंथन सुरू होते. अमेरिकेच्या इंटरनॅशनल कमॉडिटी इन्स्टिटच्यूटमार्फत हैदराबादमध्ये जागतिक तांदूळ परिषद झाली. त्यात जगभरातील २५ देशांतील तज्ज्ञ, शेतकऱ्यांचे प्रतिनिधी, संशोधक, बियाणे कंपन्यांचे प्रतिनिधी, व्यापारी, आयात-निर्यातदार उपस्थित होते. भारतातील तांदळाचा दर्जा, वाणांचे वैविध्य, उत्पादनाची व्यापकता आदींचे प्रदर्शन या परिषदेद्वारे जगापुढे मांडण्याची सुवर्णसंधी या परिषदेत होती. या परिषदेत विविध राज्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. पण, बोलबाला होता तो यजमान तेलंगणचाच.सध्या भारत तांदूळ निर्यातीत आघाडीवर आहे. त्यानंतर थायलंड, व्हिएतनाम आणि पाकिस्तानचा क्रमांक लागतो. भारत वर्षाला सुमारे १७ दशलक्ष टन तांदळाची निर्यात करतो. त्यात सर्वाधिक वाटा तेलंगण आणि आंध्र प्रदेश या राज्यांचा आहे. जवळपास १०० देशांत भारतीय तांदळाची निर्यात होते. जागतिक तांदूळ बाजारात भारताचा वाटा सुमारे ४५ टक्के आहे. हे प्रमाण आणखी वाढावे, यासाठी तुकडा तांदळाच्या निर्यातीवरील बंदी सरसकट उठवण्याची तेलंगणची मागणी आहे. या बंदीमुळे म्यानमारसारख्या देशाने लाभ उठवला. म्यानमार आता चीन, इंडोनेशिया, मलेशिया, फिलिपाइन्स आदी देशांना तांदूळ निर्यात करीत आहे. वास्तविक: म्यानमार हा १९६०च्या दशकात तांदूळ निर्यातीत आघाडीवर होता. नंतर मात्र देशांतर्गत यादवीमुळे म्यानमार पिछाडीवर गेला. आता पुन्हा या देशाने तांदूळ निर्यातीत जगाच्या नकाशावर महत्त्वाचे स्थान निर्माण केले आहे. म्यानमारची तांदूळ निर्यात पुन्हा पूर्वपदावर आली आहे. त्यास टक्कर देण्याचा तेलंगणचा प्रयत्न आहे.तेलंगणचा तांदूळ फिलिपाइन्स, अमेरिका, बांगलादेश, संयुक्त अरब अमिराती आदी देशांत प्रामुख्याने निर्यात होतो. कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाने केलेल्या २०२३-२४च्या तिसऱ्या आगाऊ अंदाजानुसार, तेलंगण हे तांदूळ उत्पादनात आघाडीवरचे राज्य आहे. यंदा राज्याचे तांदूळ उत्पादन १६६.३१ लाख मेट्रिक टन होईल. देशाच्या तांदूळ उत्पादनामध्ये हे प्रमाण सर्वाधिक १२ टक्के आहे. या आकडेवारीनुसार, देशातील पहिल्या पाच तांदूळ उत्पादक राज्यांमध्ये तेलंगणपाठोपाठ, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल, पंजाब आणि ओडिशा या राज्यांचा क्रमांक लागतो. उत्तर प्रदेशचे तांदूळ उत्पादन ११.५ टक्के, बंगालचे ११ टक्के, पंजाबचे १०.५ टक्के आणि ओडिशाचे ७.४ टक्के आहे. एकट्या तेलंगणचे तांदूळ उत्पादन हे थायलंडच्या तांदूळ उत्पादनाइतके आहे. राज्यात तांदळाच्या २२० वाणांचे उत्पादन होते. उत्तम प्रतीच्या तांदळाच्या उत्पादनाला प्रोत्साहन म्हणून प्रति क्विंटल ५०० रुपये मदत करण्याची राज्याची योजना सत्तांतरानंतरही कायम आहे.तेलंगण हे स्वतंत्र राज्य म्हणून स्थापन झाले दहा वर्षांपूर्वी. या दहा वर्षांत तेलंगणने सिंचनाखालील क्षेत्र दुपटीवर आणले. तत्कालीन मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी सुरुवातीपासून सिंचनावर भर दिल्याचे दिसते. मोठमोठ्या सिंचन प्रकल्पातून चंद्रशेखर राव यांनी आर्थिक सिंचन करून घेतल्याचाही आरोप होतो. या प्रकल्पांच्या जाहिरातींवरही त्यांनी प्रचंड पैसा ओतला. त्यातील गोदावरी नदीवर राज्याने उभारलेले कालेश्वरम धरण नेहमीच चर्चेत असते. याचा महाराष्ट्राला कितपत फायदा होईल, यावरील चर्चा सुरूच असते. या प्रकल्पासाठी एक लाख कोटी रुपयांचा खर्च आला. त्यातील तब्बल ८० हजार कोटी रु. राज्य सरकारने विविध बँका आणि वित्तसंस्थांकडून कर्जाऊ घेतले. त्याचा सरकारच्या तिजोरीला वार्षिक दहा हजार कोटींचा भार पुढची १२-१३ वर्षे पेलावा लागणार आहे. या प्रकल्पाचे खर्च-लाभ प्रमाण चुकल्याचे नमूद करीत 'कॅग'ने तेलंगण सरकारला फटकारले होते. याच प्रकल्पाचा भाग असलेल्या मेडिगड्डा बॅरेजच्या पुलाचा पाया गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये खचला होता. त्यावेळी राष्ट्रीय धरण सुरक्षा प्राधिकरणाने पाहणी करून दिलेल्या अहवालात कठोर ताशेरे ओढले होते. भविष्यात मेडिगड्डा बॅरेज पुन्हा बांधावे लागेल, असा निष्कर्ष प्राधिकरणाने काढला. म्हणजे कोट्यवधींचा खर्च पाण्यात जाणार, असे संकेत दिसतात. इतके सगळे असले तरी राव यांनी सिंचनाला प्राधान्य दिल्याचे मान्य करावे लागेल. मात्र, मुद्दा आहे तो सिंचनाच्या लाभक्षेत्राचा आणि लाभपिकांचा.तेलंगणमध्ये सर्वाधिक सिंचनक्षेत्र तांदळाचे आहे. हे प्रमाण एकूण सिंचनक्षमतेच्या ७० टक्के आहे. डाळींचे सिंचनक्षेत्र दोन टक्के, तर तेलबियांचे सिंचनक्षेत्र चार टक्के आहे. राज्यात भातक्षेत्रात वाढ होत असताना तृणधान्य आणि तेलबियांच्या उत्पादनात घट होताना दिसते. उदा. २०१३-१४मध्ये तेलबियांचे उत्पादन वर्षाला ७.२ लाख टन होते. ते २०२०-२१मध्ये ५.८ लाख टनांवर घसरले. त्यामुळे तेलबिया, डाळींची तूट निर्माण होतेच. शिवाय रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीची सुपिकता, पर्यावरण, भूजल, कर्बउत्सर्जन, प्रदूषण आदी समस्यांना तोंड द्यावे लागते. उदा. एक किलो तांदूळ उत्पादनासाठी सुमारे तीन हजार ते पाच हजार लिटर पाण्याची आवश्यकता असते. डाळी आणि तेलबियांना केवळ ९०० लिटर पाणी पुरते. जागतिक पातळीवर कृषी क्षेत्रातून होणाऱ्या कर्बउत्सर्जनापैकी सुमारे ११ टक्के कर्बउत्सर्जन भातशेतीतून होते.कृषी किंमत आयोगाच्या २०२३च्या अहवालानुसार, तेलंगणमध्ये तिळावरील गुंतवणुकीतून अधिक उत्पन्न मिळाले. तेलंगणमध्ये हे प्रमाण १९८ टक्के होते. तीळ शेतीचा उत्पादन खर्च कमी असल्याने हे शक्य झाले. तेलंगणमधील मोठ्या पिकांपैकी तीळापाठोपाठ हरभऱ्याला १२० टक्के, मका ५० टक्के, तांदूळ ४६ टक्के, सोयाबिन ३२ टक्के, तूर २३ टक्के, भुईमूग २१ टक्के आणि कापसाला ८ टक्के भाव मिळाल्याचे अहवाल सांगतो. त्यामुळे तेलंगणातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने भातापेक्षा तीळ उत्पादन लाभदायी ठरते. मात्र, शेतकरी भातशेतीलाच प्राधान्य देतात. कारण, सरकारकडून होणारी खरेदी आणि अन्य साह्यभूत धोरण हे आहे. मात्र, पिक वैविध्य राखले पाहिजे. सोयाबीन आणि तुरीची खरिपात आणि हरभरा व शेंगदाण्याची रब्बी हंगामात लागवड केल्यास उत्पादन आणि उत्पन्नात वाढ होईल, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. पिक वैविध्यासाठी थेट हस्तांतरण लाभासारखे धोरण राबविणे संयुक्तिक ठरेल. त्यातून कृषी उत्पादनाची दिर्घकालीन शाश्वतता राहील. अन्नसुरक्षा आणि नैसर्गिक साधन-संपत्तीच्या पुरेपूर उपयुक्ततेच्या दृष्टीनेही ते फायद्याचे आहे. मात्र, सध्या तरी आपला भर भातशेतीवर असल्याचे तेलंगणने जागतिक तांदूळ परिषदेतून अधोरेखित केले. त्यातून तेलंगण भातशेतीतील आघाडी टिकवून ठेवेलही, पण शाश्वत शेती, अन्नसुरक्षेचा प्रश्न यापुढे अधिकाधिक सतावत राहील.

# डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान कडून कर्जत पोलीस स्टेशनला १०० बॅरिकेड्स वाटप

**कर्जत । प्रतिनिधी**

महाराष्ट्र भुषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या माध्यमातून कर्जत पोलीस स्टेशन यांना १०० बॅरिकेटस चे वाटप समारंभ बुधवार दिनांक २३ जुलै २०२५ रोजी श्री विठ्ठल मंदिर दहिवली येथे संपन्न झाला.या सोहळ्यासाठी पोलीस निरीक्षक संदिप भोसले, कर्जत नगरपारिषदेचे मुख्याधिकारी तानाजी चव्हाण,सहाय्यक पोलीस निरीक्षक सहाय्यक पोलीस निरीक्षक राहूल वरोटे,सहाय्यक महिला पोलीस निरीक्षक मनिषा लटपटे उपस्थित होते. प्रारंभी प्रमुख पाहुण्यांनी श्री विठ्ठल मंदिरात दर्शन घेतले तेव्हा देवस्थानकडून त्यांचा सत्कार करण्यात आला.श्री गणेश पुजन व दिप प्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रतिष्ठान च्या वतीने पाहुण्यांचा सत्कार भगवान भोसले, श्रीधर बुंधाटे , अशोक भागीत व शंकर देशमुख याचे हस्ते करण्यात आला.प्रास्ताविकात विकास चित्ते यांनी डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांचे माध्यमातून होणारी कामे होणारी सामाजिक व पर्यावरण पुरक कामांची माहिती दिली. प्रतिष्ठानच्या माध्यमातून स्वच्छता अभियान, रक्तदान शिबिर, प्लाईमादान शिबीर, वैद्यकीय तपासणी शिबिर, वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, गांडूळ खत प्रकल्प, सेंद्रिय खत प्रकल्प,






पावसाचे पाणी अडविण्याचे प्रकल्प , सांडपाणी व्यवस्थापन, शारीरिक अपंगत्व आलेल्यांना वैद्यकीय साधने देणे, विहीरीतील / तलावातील गाळ काढणे इत्यादी सामाजिक कामांचा उल्लेख केला. तसेच प्रतिष्ठान चे माध्यमातून घेतलेल्या डी. वाय. पाटील स्टेडियमवर घेतलेल्या आरोग्य शिबीराची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाल्याची माहिती दिली.

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांना मरणोत्तर महाराष्ट्र भुषण, डॉ. श्री. आप्पासाहेब धर्माधिकारी यांना केंद्राचा मानाचा पद्मश्री पुरस्कार व डॉ. श्री. सचिन दादा धर्माधिकारी यांना विशेष रायगड भूषण पुरस्कार मिळाल्याची माहिती सन्माननिय पाहुण्यांना दिली.

कर्जत पोलीस स्टेशन च्या विनंती नुसार प्रतिष्ठान कडून १०० बॅरिकेट देण्यात येत असल्याचे सांगितले.पोलिस निरीक्षक संदिप भोसले यांनी मनोगत व्यक्त करताना प्रतिष्ठानने खुप मोलाची मदत केल्याचे नमुद केले ते पुढे म्हणाले की,कर्जत तालुक्यात अनेक पर्यटक येत असतात, अनेक फार्म हाऊस वर मोठ्या प्रमाणात लोक येत असतात, विशेषतः शनिवार, रविवारी होणारी वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी या बॅरिकेट मुळे खुप मदत होईल व वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यासाठी प्रतिष्ठान कडून खुप महत्वाची मदत मिळाल्याने आभार मानले. डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी, डॉ. सचिन दादा धर्माधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली चालू असलेल्या सामाजिक कामाचे व प्रकल्पाचे स्वागत करुन भविष्यातही असेल सहकार्य मिळावे अशी विनंती केली. प्रतिष्ठान च्या या सहकार्याबद्दल पोलिस स्टेशन कडून देण्यात येणारे आभारपत्राचे वाचन करुन आभारपत्र प्रतिमा दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विकास चित्ते तर आभार खडे गुरुजी यांनी मानले.

# मध्यरात्री नेकनूर पोलिसांनी २० लाखांचा गुटखा पकडला

## अपघाताचा गोंधळ उडवून आरोपी फरार

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात बंदी असलेल्या गुटख्याची तस्करी अजूनही थांबण्याचे नाव घेत नाहीये. बीड जिल्ह्यातील नेकनूर पोलिसांनी मध्यरात्री मोठी कारवाई करत सुमारे २० लाख ७१ हजार रुपयांचा गुटखा जप्त केला आहे. मात्र, या कारवाईदरम्यान अपघाताच्या गोंधळाचा फायदा घेत आरोपी फरार होण्यात यशस्वी झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत गोसावी यांना गुप्त माहिती मिळाली की, एका वाहनातून गुटखा वानगाव शिवारातून धुळे-सोलापूर महामार्गावरून आणला जात आहे. त्यानुसार मध्यरात्री १ वाजता पोलिसांनी सापळा रचून संशय पिकअप अडवला. दरम्यान, पोलिसांचे वाहन पिकअप समोर थांबताच मागून येणाऱ्या स्विफ्ट कारने पिकअप ला जोराची धडक दिली. धडक इतकी जबरदस्त होती की काही वेळ



गोंधळ निर्माण झाला. कारच्या अपघातामुळे झालेल्या धावपळीत पोलिस कर्मचारी कारमधील व्यक्तींना पाहण्यासाठी गेले असताना, टेम्पोतील आरोपी गोंधळाचा फायदा घेत पळून गेले. त्यांचा पाठलाग करत असतानाच स्विफ्ट कारमधील व्यक्तीही पसार झाले. घटनेनंतर पोलिसांनी स्विफ्ट कारची तपासणी केली असता, कारमध्ये देखील गुटख्याचा साठा आढळून आला. यातून स्पष्ट होते की, ही गुटख्याची एकाच रॅकेटद्वारे संगनमताने होणारी वाहतूक होती. या संपूर्ण कारवाईत पोलिसांनी टेम्पो व कार असा एकूण २० लाख ७१ हजार ६४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. रजनीगंधा, बाबा, विमल यांसारख्या बंदी घालण्यात आलेल्या ब्रँडचा गुटखा मोठ्या प्रमाणावर होता. नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. व पोलिसांनी फरार आरोपींचा शोध सुरू केला आहे. दरम्यान या कारवाईने गुटखा तस्करांचे धाबे दणाणले असून, स्थानिक गुन्हेगारीवर पोलिसांची नजर अधिकच तीव्र झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

## आ.प्रशांत ठाकूर चषक वक्तृत्व २०२५

# के एस ए बार्न्स स्कूलमध्ये वर्ग अंतर्गत वक्तृत्व स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढवणे, संवादकौशल्य विकसित करणे आणि नेतृत्वगुणांना चालना देणे या उद्देशाने कोशिश फाऊंडेशन व पनवेल महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेची वर्ग अंतर्गत फेरी के एस ए बार्न्स स्कूल पनवेल येथे मोठ्या उत्साहात पार पडली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेविका दर्शना भोईर, कोमल कोळी, कोशिश फाऊंडेशनचे स्वयंसेवक, शिक्षक उपस्थित होते.

या शाळेतील इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी माझं कुटुंब, माझं स्वप्न, माझा पहिला शाळेचा दिवस, शिक्षणाचं महत्त्व, स्वच्छ भारत, प्लास्टिक मुक्त भारत अशा विषयांवर आपले विचार प्रभावी पद्धतीने मांडले. विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर आत्मविश्वासाने भाषणं सादर करत उपस्थितांचे मन जिंकले. अनेक मुलांनी पहिल्यांदाच



व्यासपीठावर उभं राहून बोलण्याचा अनुभव घेतला, ज्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. या उपक्रमाचे आयोजन कोशिश फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. परेश ठाकूर यांच्या पुढाकाराने व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

मुख्याध्यापक योगिता चौधरी यांनी सांगितले, विद्यार्थ्यांनी या स्पर्धेतून उत्कृष्ट आत्मविश्वास दाखवला. पुढील फेरीसाठी विद्यार्थ्यांनी अजून चांगली तयारी करतील, ही खात्री आहे. या वर्ग अंतर्गत फेरीतील विजेत्या विद्यार्थ्यांची पुढील शाळा अंतर्गत फेरीसाठी निवड करण्यात येणार आहे. पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे ही स्पर्धा यशस्वी झाली. इयत्ता नववी मधील विद्यार्थी अभ्रम अधिकारी म्हणाला कि, कोशिश फाऊंडेशन आणि परेश ठाकूर सरांनी आम्हाला सुंदर असा मंच दिला, याबद्दल मी मनःपूर्वक धन्यवाद देतो. या स्पर्धेमुळे मला सर्वांसमोर न घाबरता बोलण्याची संधी मिळाली आणि आता मला पुढच्या फेरीसाठी अजून चांगली तयारी करायची आहे.

## जागर संविधानाचा अमृत महोत्सव कार्यक्रम भव्य स्वरूपात संपन्न

# भाषेच्या वादावरून संविधानाचा अपमान होत असेल तर तो कदापि सहन करणार नाही-केंद्रीय मंत्री रामदास आठवले

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार व संविधानाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने जागर संविधानाचा अमृत महोत्सव या भव्य कार्यक्रमाचे आयोजन वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात करण्यात आले.या विशेष कार्यक्रमाला केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री नामदार रामदास आठवले प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आपल्या भाषणात त्यांनी सांगितले की,



भाषेच्या वादावरून जर संविधानाचा अपमान होत असेल, तर तो मी कदापि सहन करणार नाही. संविधान हा आपल्या देशाचा आत्मा आहे, त्याची प्रतिष्ठा अबाधित राहणे अत्यावश्यक आहे.कार्यक्रमात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय योगदान पुरस्कार २०२५ हा मानाचा पुरस्कार डॉ. कॉ. भारत पाटणकर यांना प्रदान करण्यात आला.त्याचबरोबर, विश्वशांती पुरस्कार हा बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मा. मंदाताई विजय म्हात्रे यांना प्रदान करण्यात आला.कार्यक्रमाने उपस्थितांमध्ये संविधानाचे मूल्य, सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मतेबाबत नवचैतन्य निर्माण केले.

# दिव्यातील न्यू गुरुकुल कॉन्व्हेंट शाळेत मुलांना फायर सेफ्टीचे धडे

**संतोष पडवळ । ठाणे**

दिव्यातील दातीवली येथील न्यू गुरुकुल कॉन्व्हेंट स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज या शाळेमध्ये आज विद्यार्थ्यांना फायर सेफ्टी एज्युकेशन देण्यात आले. आपण ज्या परिसरामध्ये राहतो त्या परिसरामध्ये अचानक आग लागण्याची क्षमता मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. अशा परिस्थितीमध्ये आज फायर ब्रिगेड यंत्राचा वापर करून सहजपणे कशाप्रकारे करता मात करता येईल त्याचे धडे आज विद्यार्थ्यांना देण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे या उपक्रमामध्ये सहभाग घेऊन आग विझवण्याचे विविध धडे आत्मसात केले. विद्यार्थ्यांनी परिसरात आग लागण्याची कारणे, आग वीझविण्यासाठी असणारी विविध साधने, सरकारकडून असणाऱ्या




विविध उपाय योजना, आग विझविण्यात येणाऱ्या अडचणी, समस्या अशा विविध प्रश्नांची उकल त्याचे उत्तर मिळण्याची जिज्ञासा या सर्व प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. प्रसंगी शाळेचे संचालक प्रेम म्हात्रे तसेच शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि मुख्याध्यापिका यांनी ही या उपक्रमात सहभाग घेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या अद्यावतीकरण धोरण राबविण्यात उद्योजकांनी सहकार्य करावे-मंत्री मंगलप्रभात लोढा






**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

सार्वजनिक - खासगी भागीदारीद्वारे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या अद्यावतीकरण धोरणाची अंमलबजावणी केली जात आहे. या धोरणासाठी उद्योजकांनी पुढे येऊन सहकार्य करावे, असे आवाहन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले.जिल्हाधिकारी कार्यालयात उद्योजक व संस्था व्यवस्थापन समितीच्या सदस्यांशी संवाद साधण्यासाठी, त्यांच्या गरजा जाणून घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. या प्रसंगी आमदार विक्रम पाचपुते, माजी आमदार बबनराव पाचपुते, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी आदी उपस्थित होते.मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले, उद्योजक व शासन यांनी एकत्र येऊन काम करणे आवश्यक आहे. राज्यातील उद्योगांना आवश्यक कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये नवनवीन अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात येत असून, राज्यातील सर्व आयटीआयच्या सक्षमीकरणाला प्राधान्य दिले जात आहे. उद्योगाच्या मागणीनुसार सक्षम उद्योग सहकार्याद्वारे प्रशिक्षणार्थ्यांची रोजगारक्षमता वाढविण्यावर लक्ष केंद्रीत करण्यात येत असल्याचेही त्यांनी सांगितले.ते पुढे म्हणाले, सार्वजनिक-खाजगी भागीदारी धोरण हे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील व्यावसायिक शिक्षणाचे आधुनिकीकरण करण्यासाठी, कौशल्यातील अंतर कमी करण्यासाठी व उद्योजकांच्या गरजेशी सुसंगत कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी एक परिवर्तनकारी उपक्रम आहे. तरुण पिढीची कौशल्यवृद्धी झाल्यास त्यांच्याही हाताला काम मिळेल. या कौशल्य विकासासाठीच आयटीआयमध्ये नवनवीन अभ्यासक्रमांसोबतच अल्पकालीन अभ्यासक्रमही सुरू करण्यात येत आहेत. राज्यात कौशल्यावर आधारित मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध असून, तरुणांना प्रशिक्षित करून रोजगार देण्याचे कार्य सर्वांनी मिळून करावे, असे आवाहनही मंत्री श्री. लोढा यांनी यावेळी केले. या इंडस्ट्रियल मिटमध्ये मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी उद्योजकांशी मोकळेपणाने संवाद साधून कुशल मनुष्यबळ विषयक त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या व त्यावर सकारात्मक पावले उचलण्यात येतील, असे आश्वासन दिले.पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे विचार व त्यांनी मांडलेला वैचारिक सिद्धांत नव्या पिढीला समजावा, या उद्देशाने स्थापन करण्यात आलेल्या एकात्म मानव दर्शन हिरक महोत्सव समितीच्या माध्यमातून त्यांचे विचार सर्वदूर पोहोचवावेत, अशी अपेक्षा कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत व्यक्त केली.समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत विकास पोहोचणे हाच खरा राष्ट्रधर्म आहे. समाजातील तळागाळातील व्यक्तीला स्वावलंबी बनवणे, त्याच्या गरजा पूर्ण करणे, हा त्यांच्या विकासदृष्टीकोनाचा केंद्रबिंदू होता. पंडित दीनदयाळ उपाध्याय यांचे विचार सर्व शाळा व महाविद्यालयांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींपर्यंत पोहोचवावेत, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

## ग्लोबल ट्रस्ट व स्थानिक लोकसहभागातून तपोवन झाले पाणीदार

# पावसाचे पाणी वाहून न जाता मुरत आहे नदीपात्राच

# नदीपात्राचे केले रुंदीकरण आणि खोलीकरण

### भूजल पातळी वाढावी यासाठी नदीपात्रात घेतले 'रिचार्ज शाफ्ट' बोअर द्वारे जमीनत सोडले पाणी

## तपोवन सह परिसरातील गावांचा पाणी प्रश्न मिटणार

**परळी । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती हे ध्येय घेऊन कार्य करणाऱ्या मयांक गांधी यांच्या ग्लोबल ट्रस्ट ने पाणीदार गावे ,पाणीदार शिवार करण्याची मोहिम हाती घेतली आहे . गोवर्धन,हिवरा ह्या गावात नदीपात्रात जलसंधारणाची कामे केल्या नंतर ग्लोबल ट्रस्ट ने प्रसिद्ध रामनाथाचे देवस्थान असलेल्या तपोवन ( ता .परळी ) येथे स्थानिक लोकसहभागातून जलसंधारणाची सुनियोजित कामे केली आहेत. तपोवन ग्रामस्थांनी सदरील कामात १५ % आर्थीक वाटा उचलत ७ लाख ५० हजार रुपये लोकसहभागातून जमा करुन या ठिकाणच्या गुणवरा नदीपात्राचे रुंदीकरण आणि खोलीकरण केले आहे. पावसाचे पाणी नदीपात्रातून वाहून जावू नये यासाठी नदीपात्रात टप्प्याटप्प्यावर विशिष्ट प्रकारचे खोलीकरण करुन त्यात पाणी मुरावे असे सुनियोजन केले आहे. ह्या



खोलीकरणातील पाणी अधिकाधिक जमीनीत मुरावे यासाठी नदीपात्रातील प्रत्येक ब्लॉक ठिकाणी 'रिचार्ज शाफ्ट' बोअर घेऊन त्या द्वारे जमीनीत नैसर्गिक रित्या पाणी मुरवण्याचे नियोजन केले आहे. या मुळे भूजल पातळीत जबरदस्त वाढ होणारी आहे. लाखो लिटर पाणी या ठिकाणी जमीनत मुरणार आहे. उन्हाळ्या मध्येच नदीपात्राचे काम सुरु करण्यात आले होते , गाव हद्दीतील जवळपास अडीच किमी पर्यंत नदीपात्रात खोलीकरण व रुंदीकरणाचे काम करण्यात आले आहे. नदीपात्रात ११ दिवसांपासून पाणी मुरल्या जात आहे. खोलीकरण करुन नदीपात्रात जागोजागी तयार केलेले ब्लॉकेज( मोठी खड्डे ) मधून टप्प्या टप्प्याने पाणी पुढे सरकत आहे. प्रत्येक ब्लॉकेज मध्ये 'रिचार्ज शाफ्ट' बोअर आहेत ज्या द्वारे पाणी जमीनीत जात आहे. नदीपात्रात पाणी एवढ्या मोठ्या प्रमाणात मुरत आहे कि अजून दोन दिवस तरी पाणी गाव शिवारातील नदी बाहेर पडू शकणार नाही. या मुळे भूजल पाणी पातळी वाढून ह्या भागातील विहिर ,बोअर पाणी स्त्रोतांना पाणी वाढणार आहे आणि पाणी प्रश्न कायमचा मिटणार आहे. शेतकरी,ग्रामस्थ यांच्या मध्ये खूप आनंदाचे वातावरण आहे. हर्षोल्लासाने तपोवन ग्रामस्थांनी नदीपात्रात जाऊन जलपुजन केले. या वेळी ग्लोबल विकास ट्रस्ट चे कर्मचारी,अधिकारी उपस्थित होते.

### बंधाऱ्याची खुप आवश्यकता आहे

**तपोवन नदीचे रुंदीकरण/खोलीकरण अंत्यत योग्य पद्धतीने ग्लोबल विकास ट्रस्ट या संस्थेने केले .नैसर्गिक रित्या पाणी मुरवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. परंतु आता या ठिकाणी नदीपात्रात बंधारे होणे खुप आवश्यक आहे. शासन/प्रशासनाने या कडे लक्ष देऊन तपोवन च्या गुणवरा नदी पात्रात बंधारे उभारावेत अशी मागणी तपोवन ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे.**

### शेतकरी फळबागे कडे वळणार

**ह्या भागातील शेतकरी ऊस ,कापुस,सोयाबीन अशी हंगामी पिके घेतात परंतु आता ग्लोबल विकास ट्रस्ट ने नदीपात्रात केलेल्या जलसंधारणाच्या कामा मुळे पावसाचे पाणी वाहून न जाता त्याच ठिकाणी मुरल्या जात आहे. या मुळे पाणी पातळीत वाढ होऊन विहिर , बोअर ह्या पाणी स्त्रोतात पाणी वाढ निश्चितच होणार आहे. शेतकऱ्यांच्या आशा आता पल्लवित झाल्या असुन हंगामी पिका बरोबर फळबाग शेती कडे तपोवन चे शेतकरी आता वळणार आहेत.**

## रास्ते गड्ढों से भरे पड़े हैं और दादा सपनों में मंत्रालय घेरे पड़े हैं

### प्रकाशदादांचं स्वप्न: मंत्री होण्याआधी मतदारसंघ उजेडात आणा!

# विकासाच्या मार्गात राजकीय स्वार्थ आडवा येतोय का? असा सवाल थेट दादांनाच विचारला जात आहे

**माजलगाव । लोकपत्रकार भांगे**


माझी जात आडवी येते म्हणून मंत्री होता येत नाही, अशी भावना व्यक्त करत आमदार प्रकाश सोळंके यांनी मंत्रीपदासाठी पुन्हा एकदा शर्यतीत उडी घेतली आहे. मात्र, त्यांच्या या विधानावरून बीड जिल्ह्यात आणि विशेषतः माजलगाव मतदारसंघात प्रचंड चर्चा रंगल्या आहेत.

**दादा, जागा बसली पण उठेना, मग मंत्री होऊन काय करणार?**

असा सवाल जनतेतून उपस्थित केला जात आहे. मतदारसंघात मूलभूत सुविधा अजूनही अपूर्ण असताना मंत्रीपदाचं स्वप्न पाहणं म्हणजे जनतेच्या जखमेवर मीठ चोळणं, अशा प्रतिक्रिया उमटत आहेत. पाडळसिंगी ते लोखंडी सावरगाव महामार्गाचे काम पूर्ण झाले, मात्र त्याच मतदारसंघातील वडवणी ते थेटेगावण रस्ता अजूनही रखडलेला आहे. लोकांच्या मते, दादांच्या साखर कारखान्याचा घाटावर ऊस न जावो यासाठी मुद्दाम रस्ता अडवण्यात आला आहे, अशी कुजबुज जनतेत चालू आहे. विकासाच्या मार्गात राजकीय स्वार्थ आडवा येतोय का? असा सवाल थेट दादांनाच विचारला जात आहे.

**प्रश्न असा की – आधी अंधारात असलेला मतदारसंघ उजेडात आणायचा की मंत्रीपदाचे झगमगते स्वप्न पहायचे?**

याच पार्श्वभूमीवर, बीड जिल्ह्याला ओबीसीसाठी राखीव मानणं, आणि मराठा



समाजाकडे दुर्लक्ष झाल्याची खंत प्रकाशदादांनी व्यक्त केली आहे. मात्र मागील तीन दशकांत त्यांनी स्वतः काय विकास केला, हा प्रश्न उभा राहतो. धनंजय मुंडेंना मिळालेल्या न्यायालयीन दिलास्यानंतर बीडमध्ये पुन्हा एकदा त्यांचे मंत्रीपद निश्चित असल्याच्या चर्चा सुरू झाल्या आणि लगेचच प्रकाश सोळंके यांनी पुन्हा मंत्रीपदासाठी आवाज उठवला. यावरून काहींचं म्हणणं आहे की, संधी मिळेल तिथे वाद निर्माण करणं हेच काही राजकीय नेत्यांचं आता धोरण झालं आहे.प्रकाशदादा, आधी रस्ते, वीज, पाणी आणि सामान्य जनतेच्या अडचणींवर लक्ष केंद्रित करा. जनतेची कामं झाल्यावरच मंत्रीपदाची स्वप्नं शोभून दिसतील. अन्यथा, बसली जागा पण उठेना अन मंत्री होऊन काय करणार? हेच वाक्य जनतेच्या तोंडी राहील.

# साईराम गुळाचा चहा व लस्सीचा भव्य शुभारंभ



**नांदेड । हनुमंत चंदनक**

नांदेडच्या नरसी चौकात आज दिनांक २५/०७/२०२५ रोजी सुनिल गोविंदराव पाटील कदम व दादाराव माधवराव नरवाडे यांच्या नांदेडातील सुप्रसिद्ध साईराम गुळाचा चहा व लस्सी सेंटरच्या भव्य शुभारंभ १०८ महंत श्रीगुरु यदूबन गुरु गंबिरबन महाराज कोलंबीकर यांच्या शुभहस्ते उद्घाटन सोहळा संपन्न झाला कार्यक्रमाप्रसंगी आनंदपुरी महाराज चोळावा नांदेड जिल्ह्याचे खासदार रवींद्र पाटील चव्हाण यांचे प्रतिनिधी श्रीनिवास पाटील चव्हाण,देवराव दत्तराम पाटील ढगे, आनिल गोविंदराव पाटील कदम (भाऊ) गोविंदराव गंगाधर पा कदमवडील परमेश्वर रामराव पाटील कदम आटाळेकर पांडुरंग पाटील कदम आटाळेकर दत्ताहारी व्यंकटराव पाटील शिंदे हरेगावकर माधव शामराव पाटील शिंदे आटाळा गजानन सुदर्शन पाटील कदम आटाळा डॉक्टर दिगंबर पाटील कदम आटाळा दत्ताहरी माणिकराव कदम हनुमंत इरबा पाटील जाधव व्यंकट दिगंबर पाटील कदम शिवराज दिगंबर पाटील कदम देविदास गंगाधर पाटील कदम दत्ताहरी रामराव पाटील कदम काडाळा, दिगंबर माणिकराव पाटील जाधव खदगाव बळीराम बालाजी कल्याण खैरगाव शिवलिंग बाबाराव पाटील कदम उमाकांत शेषराव पाटील जाधव कोकणे फोटो स्टुडिओ नरसी वसंतराव कस्तुरे नरसी (इमारतीचे मालक )पिंटू रामराव कल्याण खैरगाव गजानन पाटील कल्याण खैरगाव नरसी परिसरातील नागरि् मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आ. नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांचा बीड जिल्हा दौरा

# ग्रामीण भागातील समस्या आणि भ्रष्टाचारा वर सखोल चर्चा-आम्रपाली साबळे



**बीड । प्रतिनिधी**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, मुंबईचे अध्यक्ष व कॅबिनेट मंत्री दर्जाचे आमदार नरेंद्र अण्णासाहेब पाटील यांनी बीड जिल्ह्याचा दौरा केला. या दौऱ्यात त्यांनी बीड शहरासह विविध गावांतील समस्या जाणून घेतल्या.या वेळी बीड जिल्हा व ग्रामीण भागातील नागरिकांनी ग्रामपंचायतींमध्ये होत असलेल्या भ्रष्टाचारावर तसेच मूलभूत सुविधांच्या अभावावर आवाज उठवला. अनेक गावांमध्ये रस्त्यांची दयनीय अवस्था असून, त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत जाताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे, याकडे नागरिकांनी लक्ष वेधले.

या भेटीत अन्याय अत्याचार भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या बीड जिल्हा अध्यक्षा सौ. आम्रपाली साबळे यांनी आमदार पाटील यांच्याशी सविस्तर चर्चा केली. त्यांनी ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचार, ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणातील अडथळे, तसेच राज्य सरकारकडून दुर्लक्षित होत असलेला ग्रामीण महसूल यासारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर माहिती दिली.या समस्यांची गंभीर दखल घेत, आ. पाटील यांनी मी माझ्या पद्धतीने सर्व कामे करणार आहे आणि ग्रामीण भागातील अन्याय, अत्याचार, व भ्रष्टाचार दूर करण्यासाठी ठोस पावले उचलली जातील, असा ठाम शब्द दिला.या दौऱ्यात विविध सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक नागरिक व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ. पाटील यांचा दौरा हा बीड जिल्ह्यातील जनतेसाठी आश्वासक ठरला असून लवकरच या संवादाचे सकारात्मक परिणाम दिसतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# कारगिल युद्ध विजय स्मृतिदिनी शहिदांना महामानव अभिवादन ग्रुप तर्फे विनम्र अभिवादन

## कॅप्टन राजाभाऊ आठवले यांचा सत्कार संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

नापाक इराद्याने भारत भूमीवर आक्रमण केल्यामुळे पाकिस्तान विरुद्ध १९९९ साली कारगिल युद्ध करावे लागले व त्यात भारताने विजय प्राप्त केला. आपल्या भारत भूमीचे रक्षण करण्याकरिता अनेक जवान शहीद झाले.त्यांच्या पावन स्मृतीस कारगिल युद्धाच्या विजयी स्मृतिदिनी महामानव अभिवादन ग्रुपने महामानव महिला नागरी सहकारी पतपेढी धानोरा रोड बीड येथे शहिदांना भावपूर्ण विनम्र अभिवादन करून त्या युद्धात सहभागी असलेले कॅप्टन राजाभाऊ आठवले यांचा सत्कार संपन्न केला.

कार्यक्रमाचे अध्यक्षपदी से नी जिल्हा प्रबंधक (एलआयसी )यु. एस.वाघमारे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक कार्यकर्ते प्रशांत वासनिक यांची उपस्थिती होती. याप्रसंगी प्रशांत वासनिक उपस्थितांना संबोधित करताना म्हणाले की भारतीय सीमेवर तैनात असलेली सैनिक रात्रनदिवस सतर्क राहून आपले शीर तळहातावर घेऊन सीमेचे व आपल्या



नागरी जीवनाचे संरक्षण करीत असतात. त्यात त्यांना काही वेळा वीर मरण देखील पत्करावे लागते. त्यांच्या ह्या असीम त्यागाचे आपण सर्वच नेहमी कृतज्ञ असावयास पाहिजे. देशाचे संरक्षण करताना, मी प्रथम भारतीय आहे आणि अंतिमतः भारतीय, हि राष्ट्र संकल्पना मनात पक्की रुजवून प्राणपणाला लावून सीमा रक्षण करीत असतात. सत्काराला उत्तर देताना कॅप्टन राजाभाऊ आठवले यांनी सांगितले की उंच उंच बर्फाळ दरी डोंगरात सैनिकांना कशा कशा प्रकारच्या संकटांना तोंड द्यावे लागते हे वर्णन चित्रफीत दाखवल्याप्रमाणे उपस्थितांसमोर युद्धचे चित्र उभे केले तेव्हा त्यांनी वर्णन केलेल्या परिस्थितीच्या कल्पनेनेच अंगावर काटे उभे राहिले व प्रत्येकाच्या हृदयाचा ठोका चुकतो की काय असे वाटले. अध्यक्षीय समारोपात अध्यक्ष महोदय यांनी नौदल,भूदल व वायुदल मधील सैनिक देश रक्षणाकरिता २४ तास कसे सतर्क असतात हे सांगून नागरी जीवन जगत असताना राजकीय मतभेद कितीही असले तरी देश प्रथम यालाच प्रथम प्राधान्य देऊन सर्वांनी गुण्यागोविंदाने राहून आप आपल्या परीने कार्य करून देश सेवा कशी घडेल याची काळजी घेणे सर्वांच्या हिताची आहे हे स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.एम.राऊत यांनी केले तर प्रास्ताविक महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष आयु जी.एम.भोले यांनी केले कार्यक्रमास डी जी वानखेडे,ड तेजस वडमारे,काशिनाथ वाघमारे,बी.डी.तांगडे व बहुसंख्य सदस्य उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077